# Listening Passages

## किवी पक्षी

मित्रांनो, मी किवी. मी एक पक्षी आहे. पण मला उडता येत नाही. मी फक्त रात्रीच फिरतो. मला कमी दिसते पण ऐकू मात्र खूप येते. माझी चोच लांब, बारीक आहे. माझे पाय आखूड आहेत पण मजबूत आहेत. मी जोरात पळू शकतो. गांडुळे, किडे, कुजलेली फळे हे माझे अन्न. माझी चोच मी जमिनीत खुपसतो आणि माझे अन्न मिळवतो. मी कि-वी, कि-वी असा आवाज काढतो म्हणून माझे नाव किवी आहे. मी फक्त न्यूझीलंड देशातच राहतो.

प्रश्न

१. किवी कोण आहे?
२. किवीची चोच आणि पाय कसे आहेत?
३. किवीचे अन्न कोणते?
४. माझे नाव किवी का आहे?
५. किवी हा पक्षी कुठे राहतो?

Produced by BMM Shala Exam Committee
© Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

## Listening Passages

### कोडे

आईने अनिलला एक कोडे घातले. सगळया सुलट्या गोष्टी उलट्या करता येतील पण अशी कोणती वस्तू आहे की ती उलटी करा, आडवी करा किंवा तिरकी करा. ती नेहमीच सुलटी म्हणजे वर जाणारी राहते.

अनिलने बऱ्याच वस्तू उलट्या करून बघितल्या पण त्या उलट्याच राहात होत्या. मग आईने एक मेणबत्ती पेटवली, अनिलच्या हातात दिली आणि म्हणाली, “कर ही मेणबत्ती उलटी”. अनिलने मेणबत्ती उलटी धरली आणि काय आश्चर्य! मेणबत्तीची ज्योत उलटी होईचना. ती वरच्या दिशेनेच राहिली. वा! मिळालं की उत्तर. अनिलला खूप आनंद झाला.

प्रश्न:

१. आईने अनिलला काय घातले?

२. आईने अनिलला काय करायला सांगितले?

३. अनिलला वस्तू मिळाली का? मग आईने काय केले?

४. अनिलला उत्तर कधी मिळालं?

५. तुम्हाला कोडी सोडवायला आवडतात का?

Produced by BMM Shala Exam Committee
© Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

## Reading Passages

### आयझॅक न्यूटन

गुरुत्वाकर्षणाचा (Gravity) शोध लावणारा न्यूटन हुशार तर होताच शिवाय विनोदी स्वभावाचा होता. त्याचा पोषाख अतिशय साधा असे. एकदा त्याच्या अंगावरच्या कोटाला दोन चार भोके पडली होती. त्याकडे त्याचे लक्ष नव्हते. तो आपले काम करत होता. त्याच्याकडे एक माणूस आला. तो म्हणाला, " मिस्टर न्यूटन, तुमच्या कोटाला भोके पडली आहेत. त्यातून तुमची गरीबी बाहेर येते आहे." न्यूटन म्हणाला, "महाशय, तसे नाही. या भोकातून तुमचा मूर्खपणा आत शिरतो आहे." तो माणूस गप्प बसला आणि निघून गेला.

प्रश्न:

१. न्यूटन कसा होता?

२. त्याचा पोषाख कसा असे?

३. त्याच्या कोटाकडे बघून एक माणूस काय म्हणाला?

४. त्या माणसाला न्यूटन काय म्हणाला?

५. न्यूटनने कसला शोध लावला होता?

Produced by BMM Shala Exam Committee
© Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

## Reading Passages

### हळूबाई

अनिताला सगळे हळूबाई म्हणतात. कारण तिला पटापट काहीच करता येत नाही. तिची आंघोळ हळूहळू आणि कपडे घालणे हळूहळू. तिला जेवायलाही खूप वेळ लागतो. सगळेजण जेवून निघून जातात तरी अनिता आपली जेवतच असते. एकदा आईने तिला सांगितले, " तू जर लवकर जेवली नाहीस तर जेवण झाल्यावर तुला नंतरचे सगळे आवरावे लागेल. "अनिताने एकदोन दिवस सगळे काम केले पण नंतर तिला कामाचा कंटाळा आला. मग ती भराभर जेवायला लागली.

प्रश्न:

१. अनिताला सगळे हळूबाई का म्हणतात?

२. ती कोणती कामे हळूहळू करते?

३. एकदा आईने अनिताला काय सांगितले?

४. अनिताने एक दोन दिवस काम केल्यावर काय झालं?

५. तुम्हाला कोणते काम करायला खूप वेळ लागतो? का?

Produced by BMM Shala Exam Committee
© Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.